**MHNS160010372023**

## <u>आदेश नि.क्रं. ०५ खाली</u>

## दिनांक ०२/०५/२०२६

(१) वादींनी सदरचा दावा जाहीर ठराव होउन मिळणेसाठी, सरस–निरस मानाने वाटप होउन तुटक कब्जा मिळणेसाठी व निरंतरचा ताकिद हुकूम मिळण्यासाठी दाखल केला असुन सदरच्या दाव्यात वादींनी प्रतिवादीविरुध्द नि.क्रं. ०५ खाली प्रतिवादी क्र. १ याने दावा मिळकती प्रतिवादी क्र. १ व ६ यांचा नावावर असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ व ६ यांनी दावा मिळकती कुणासही खरेदी, विक्री, गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र वगैरे तबदीलीच्या लेखाने तबदीली करु नये व मिळकतीवर कर्जाचे बोजे निर्माण करु नये या करीता तात्पुरता ताकिद मनाई हुकूमा करीता सदर अर्ज दाखल केला आहे.

(२) वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, तुकडी.जि.प.नाशिक पो.तु.ता.प. समिती चांदवड पैकी मौजे हिवरखेडे या गावचे शिवारातील शेतजमिनीचे वर्णन येणे प्रमाणे –

**अ)** गट क्र.१६ यांसी क्षेत्र हे०१.१३आर + पो.ख. हे००.०३आर, असे एकुण क्षेत्र हे०१.१६आर, यांसी आकार रक्कम रु.०५.१७पैसे, यांसी चतुःसिमा

**पुर्वेसः–** नदी,

**पश्चिमः–** दगुबाई कारभारी नवले यांची मिळकत,

**दक्षिणः–** पंढरीनाथ भिका नवले यांची मिळकत,

**उत्तरः–** शंकर पुंडलीक शिंदे यांची मिळकत.

यात एक विहीर व त्यावरील इलेक्ट्रीक मोटर कनेक्शन

**ब)** गट क्र.२०२ यांसी क्षेत्र हे०२.६३आर, यांसी आकार रक्कम रु.०४.५०पैसे, यांसी चतुःसिमा

पुर्वेसः– गरुड यांची मिळकत,

**पश्चिमः–**शिव,

**दक्षिणः–** कैलास शंकर नवले यांची मिळकत,

**उत्तरः–** गरुड यांची मिळकत.

यात एक विहीर.

येणे प्रमणे मिळकती जलतरु तदंगभुत वस्तूंसह असलेली दरोबस्त मिळकत. सदर मिळकतीस स्पष्टता येण्याकरीता यापुढे **दावा मिळकत** असे संबोधण्यात येते.

(३) वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मिळकत गट क्र. १६ व २०२ या ह्या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जीत मिळकती असुन वादीचे मुळ पुरुष हनुमंत नवले हे होते हनुमंत नवले यांना इंदुबाई वत्सलाबाई, शामाबाई, व रंजनाबाई अशा चार पत्नी होत्या व त्यापैकी इंदुबाई वस्तलाबाई व शामाबाई या मयत आहे, त्यापैकी इंदुबाई यांना वारस मुलगा नामे राजेंद्र हा आहे, तसेच वत्सलाबाई हिस वारस एक मुलगी नामे अलका ही असुन मयत शामाबाई हिस एक मुलगा नामे चंद्रशेखर हा आहे व चौथी पत्नी नामे रंजनाबाई ही हयात आहे. तसेच लक्ष्मीबाई विठ्ठल ठाकरे ही वादी व प्रतिवादी क्र.१ चे वडीलांची बहिण होती व लक्ष्मीबाई विठ्ठल ठाकरे ही मयत असुन तिस प्रतिवादी क्र.२ हा एकमेव वारस आहे व तसेच शांताबाई चिमा मापारी ही देखील मयत हनुमंत नवले म्हणजे वादी व प्रतिवादी क्र.१ चे वडील यांची बहिण होती व तिस प्रतिवादी क्र.३ ते ५ हे वारस आहेत असे कथन केले आहे.

(४) वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, हनुमंत सखाराम नवले हे ता.१९/०२/२०११ रोजी मयत झाले असुन त्यांचे मृत्युनंतर उपरोक्त मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ़ राईट्सला फेरफार नोंद क्र.१३५१ नेवारसांची नावे दाखल झाली त्यावेळी प्रतिवादी यांनी वादी क्र. १ यास काहीएक कल्पना न देता त्यांचे पश्चात वारस नोंद करुन घेतली. वादी क्र.१ ची आई शामाबाई हिचा मयत हनुमंत नवले यांनी त्याग केल्यामुळे वादी क्र.१ हा लहानपनासुनच

तारुखेडले, ता. निफाड, जि.नाशिक मामाचे गावी आस्रयास राहत होता. वादी क्र.१ चे आईने गंधर्व विवाह केला त्यामुळे वादी क्र.१ चे पालण, पोषण व सांभाळ हा त्यांचे मामा यांनीच केला. त्यानंतर वादी क्र.१ हे कामधंद्या निमित्ताने मुंबई येथे राहु लागले व त्यांचे गावी हिवरखेडे येथे येणे जाणे नसल्याने प्रतिवादी यांनी वडील मयत झाले बाबत देखील वादी क्र.१ यास कळविले नाही व परस्पर लबाडीने वादी क्र. १ चे संमती विना फेरफार नोंद क्र.१३५१ मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ़ राईट्सला वारसाने करुन घेतली व तसेच वादी क्र.२ हिस देखील या बाबत कल्पना दिली नाही. अलिकडे वादी क्र.१ हा गावी आला असता त्याने मिळकतीचे ७/१२ उतारे व फेरफार नोंदी काढल्या असता प्रतिवादी यांनी मिळकतीचे ७/१२ उता–यावर रेकॉर्ड ऑफ़ राईट्स सदरी फेरफार नोंद क्र. १३५१ ही बेकायदेशिर केल्याचे निदर्शनास आले. वादी हे मयत हनुमंत नवले यांचे कायदेशिर वारसदार असुन वादी यांचा दावा मिळकतीमध्ये कायदेशिर अविभक्त असा हिस्सा आहे. प्रतिवादी यांनी हेतुपुरस्करपणे वादी यांना दावा मिळकतीमध्ये असलेला त्यांचा कायदेशिर हिस्सा द्यावा लागु नये म्हणून उपरोक्त कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर बेकायदेशिरपणे वारसा हक्काने स्वतःची नावे लावुन घेतलेली आहे असे कथन केले आहे.

(५) वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी सदर बाबत प्रतिवादी यांना विचारणा केली असता प्रतिवादी क्र.१ ने उडवा उडवीची उत्तरे देवुन वादींचा असलेला कायदेशीर अविभक्त हिस्सा देण्यास टाळाटाळ केली म्हणून वादी यांनी दि. ११/०६/२०२३ रोजी गावातील प्रतिष्ठीत इसमांना बोलावुन सदरची बाब निदर्शनास आणुन दिली त्यावेळी गावातील प्रतिष्ठीत इसमांनी देखील प्रतिवादी क्र.१ यास वादी यांचा दावा मिळकती मध्ये असलेला कायदेशिर अविभक्त हिस्सा देण्या बाबत सांगितले परंतु प्रतिवादी क्र.१ याने वादी यांचा असलेला कायदेशिर अविभक्त हिस्सा देण्यास स्पष्टपणे नकार दिला प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशिर असे

आहे असे कथन केले आहे.

(६) वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीमध्ये वादी यांचा अविभक्त हिस्सा आहे याची माहिती व जाणिव प्रतिवादी क्र.१ व ६ यांना प्रथम पासुन होती व वादी यांचा दावा मिळकतीमधील असलेला अविभक्त हिस्सा वादी यांना द्यावा लागु नये म्हणुन प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी आपआपसात संगनमत करुन वादी यांचा दावा मिळकती मधील असलेला अविभक्त हिश्यास बाघ आणन्याचे उद्देशाने दावा मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ़ राईट्स सदरी चुकीची व बेकायदेशिर अशी फेरफार नोंद क्र. १३५१ ही केलेली असुन सदरचे नोंदीने प्रतिवादी क्र.१ व ६ यांना पुर्णपणे हक्क मिळत नाही, सदरची नोंद ही वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचेवर बंधनकारक नाही व तसेच वादी यांचा दावा मिळकती मध्ये सामाईक अविभक्त हिस्सा आहे त्यामुळे वादी यांनी त्यांचा असलेला अविभक्त हिस्सा अलग व तुटक करुन मिळणेसाठीचा व तसेच दावा मिळकत संबंधाने झालेली फेरफार नोंद क्र. १३५१ ही वादी यांचे बंधनकारक नाही असा जाहिर ठराव करुन मिळणेसाठी व दावा मिळकती सदरी प्रतिवादी क्र. १ व ६ यांचे नावावर आहे याचा गैरफ़ायदा घेवुन प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी दावा मिळकती कुणासही खरेदी, विक्री, गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र वगैरे तबदीलीच्या लेखाने तबदीली करु नये व मिळकतीवर कर्जाचे बोजे निर्माण करु नये अशी निरंतरची ताकीद देवविण्यासाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचाही सदरहु मिळकती मध्ये कायदेशिर हिस्सा असुन ते दावा मिळकतीचे सहहिस्सेदार असलेने दाव्यात तांत्रिक दोष राहु नये व आवश्यक पक्षकाराची उणिव भासु नये म्हणून त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामिल केलेले असुन त्यांचे विरुध्द काहीएक मागणी नाही असे कथन केले आहे.

(७) वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शणी वादी यांना चांगली केस असुन न्यायाचे समतोलत्व या वादी यांचे लाभात असुन ते प्रतिवादी क्र.१ व ६ यांचे लाभात नाही. तरी वादीचे दाव्यातील मागणी

प्रमाणे प्रतिवादी क्र.१ व ६ यांचे विरुध्द दावा मिळकती तबदीली करु नये व मिळकतीवर कर्जाचे बोजे निर्माण करु नये अशी निरंतरची ताकीद देववावी तशी ती न दिल्यास वादी यांचे कधीही भरुन येणार नाही असे अपरिमित असे फ़ारमोठे नुकसान होईल व दावा मिळकती या प्रतिवादी क्र.१ व ६ यांचे नावाने असलेने त्याचा गैरफ़ायदा घेवुन प्रतिवादी हे दावा मिळकतीचे त्रयस्तास हस्तांतर करतील व त्यामुळे दाव्यात कायदेशिर गुंतागुंत निर्माण होईल व वादी यांना त्यांचे न्याय हक्कापासुन व मालकी हक्कापासुन वंचित व्हावे लागले, याउलट प्रतिवादी क्र. १ व ६ यांचेकाहीएक नुकसान होणार नाही अगर गैरसोय होणार नाही. म्हणून प्रतिवादी विरुद्ध तात्पूरती ताकीद हुकुम देवावा अशी विनंती केली आहे.

(८) प्रतिवादी क्र. १ व ६ या प्रकरणात हजर झाले व त्यांनी नि. क्रं. २३ वर त्याचा लेखी जबाब दाखल केलेला आहे. त्यांनी त्यांच्या जवाबात दाव्यातील वादींची मागणी ही पुर्ण खोटी व काल्पनीक अशी आहे म्हणून वादींचा दावा खर्चासह रद्द होण्यास पात्र असल्याचे कथन केले आहे.

(९) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांचा मयत हनुमंत सखाराम नवले यांचे कुटूंबाबरोबर कोणताही संबंध नव्हता व नाही. वादी यांनी दाव्यात दिलेला वंशवृक्ष हा काल्पनीक व खोटा असा आहे म्हणून प्रतिवादींना मान्य नाही व कबुल नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दाव्यातील मिळकत गट क्र. १६ व २०२ या मिळकती बरोबर वादी यांचा कोणताही हक्क व हितसंबंध नसल्यामुळे या मिळकती नेमक्या कुणाच्या मालकीच्या आहेत हे देखील वादी यांना माहीती नाही म्हणून वादी यांनी दाव्यात गट क्र. १६ व २०२ या मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जीत असल्याबाबतचे चुकीचे कथन केलेले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत हनुमंत सखाराम नवले यांना इंदुबाई हनुमंत नवले ह्या प्रथम पत्नी होत्या. त्यानंतर मयत हनुमंत सखाराम नवले यांनी प्रतिवादी क्र. ६ रंजनाबाई हनुमंत नवले यांचे बरोबर दुसरा विवाह केला होता परंतु वादी यांनी कथन केलेल्या दाव्यातील वत्सलाबाई व शामाबाई

यांचे बरोबर मयत हनुमंत सखाराम नवले यांचा कोणताही संबंध नव्हता व नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत हनुमंत सखाराम नवले यांचेपासून शामाबाई नावाच्या महिलेस वादी क्र.१ चंद्रशेखर हा मुलगा झालेला नव्हता. तसेच मयत हनुमंत सखाराम नवले यांचेपासून वत्सलाबाई नावाचे महिलेस वादी क्र.२ अलका ही मुलगी झालेली नव्हती. त्याबाबतचे वादीचे दाव्यातील कथन हे साफ खोटे आहे. मयत हनुमंत सखाराम नवले यांना पत्नी इंदुबाई उर्फ कल्याबाई हनुमंत नवले यांचेपासून प्रतिवादी क्र.१ राजेंद्रकुमार हनुमंत नवले हा एकमेव मुलगा असून प्रतिवादी क्र. १ हेच दावा मिळकतीचे मयत हनुमंत सखाराम नवले यांचे कायदेशीर वारस आहेत इतर कुणीही नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी दावा कलम ३ मध्ये शांताबाई चिमा मापारी यांना प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे वारस असल्याबाबतचे केलेले कथन खोटे आहे. वादी यांनी दाव्यात दिलेले वारस हे बरोबर नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत शांताबाई चिमा मापारी यांनी काळुराम चिमाजी मापारी नावाचा मुलगा आहे व त्यास दाव्याकामी सामील केलेले नाही म्हणून वादी यांना मयत हनुमंत सखाराम नवले यांचे बहीणीबाबत माहीती नाही म्हणून वादीचा दावा हा खोटा आहे असे कथन केले आहे.

(१०) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांना हनुमंत सखाराम नवले हे ता. १९/२/२०११ रोजी कसे व कोठे मयत झाले याची माहीती वादीला नाही. दाव्यातील मिळकतींना प्रतिवादी क्र. १ यांचे नाव ता. २०/१/१९७१ रोजी झालेले फेरफार नोंद क्र. १४९४ नुसार दाखल झालेले होते व ती नोंद मे. मंडल अधिकारी यांनी ता.९/३/१९७१ रोजी मंजुर केलेली आहे. वादी यांना दावा मिळकतीची व दाव्याचा रेकॉर्डची कोणतीही माहीती नसल्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांची नावे फेरफार नोंद क्र.१३५१ प्रमाणे दाखल करण्यात आली असे खोटे व चुकीचे कथन केलेले आहे. वादी क्र. १ हे कोठे व कुणाकडे राहत होते याची या प्रतिवादींना कोणतीही माहीती नाही. परंतु

वादी क्र.१ यांचे आईने गंधर्व विवाह केला त्यामुळे वादी क्र. १ चे पालन, पोषण, सांभाळ मामा यांनी केला याबाबतची माहीती प्रतिवादींना नाही. वादी क्र. १ हे कोठे राहतात हे या प्रतिवादींना माहीती नाही तसेच वादी क्र.१ यांचा हिवरखेडे येथे कोणताही संबंध नसल्यामुळे हिवरखेडे येथे येणे जाणे असल्याचा काहीही संबंध नव्हता व नाही. मयत हनुमंत सखाराम नवले यांचे बरोबर वादी क्र. १ व २ यांचा कोणताही संबंध नसल्यामुळे मयत हनुमंत सखाराम नवले यांचे मृत्युबाबत कळविण्याचा कोणताही संबंध नव्हता व नाही. तसेच वादी क्र. १ यांचे संमतीविना फेरफार नोंद क्र. १३५१ ही रेकॉर्ड ऑफ राईटला वारसाने करून घेतली तिचे बाबत वादी क्र. २ हीस देखील कळविले नाही कारण वादी यांचा दावा मिळकती बरोबर व प्रतिवादी क्र. १ व ६ चे कुटूंबाबरोबर कोणताही संबंध नसल्यामुळे वादींना मयत हनुमंता सखाराम नवले यांचे मृत्यु बाबत कळविण्याचे कोणतेही कारण नव्हते व नाही. रेकॉर्ड ऑफ राईटला झालेली फेरफार नोंद क्र. १३५१ ही पुर्णतः कायदेशीर अशी आहे. वादी हे मयत हनुमंता सखाराम नवले यांचे कायदेशीर किंवा कोणत्याही अर्थाने वारस नव्हते व नाही. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कायदेशीर अविभक्त हिस्सा असल्याचा प्रश्नच उद्भवत नाही. वादी यांचा दावा मिळकती बरोबर कोणताही हक्क व हितसंबंध नसल्याने वादी यांना हिस्सा देण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. रेकॉर्ड ऑफ राईटला ता. २०/१/१९७१ रोजी वारस नोंद क्र. १४९४ ही झालेली असून त्यानंतर ता. २४/६/२०११ रोजी फेरफार नोंद क्र. १३५१ प्रमाणे पुन्हा वारस नोंद झालेली आहे. या उपरोक्त नोंदी बाबत वादी यांनी सुमारे ५२ वर्षामध्ये कधीही कोणतीही तक्रार केलेली नव्हती व नाही. म्हणून वादीचा दावा साफ खोटा असा आहे असे कथन केले आहे.

(११) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हे कधीही प्रतिवादी यांचेकडे आलेले नाही. प्रतिवादी हे कोठे राहतात याची देखील वादी यांना कोणतीही माहीती नाही. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ व ६ यांचा दाव्यात

दिलेला पत्ता देखील चुकीचा आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे येऊन विचारणा करणेचा प्रसंगच कधीही उपस्थित झाला नाही. गावातील कुणीही प्रतिष्ठीत इसमांनी प्रतिवादी यांना कधीही, कोणतीही बाब सांगितलेली नव्हती व नाही. त्याबाबतची वादीचे दाव्यातील कथन काल्पनीक व खोटे आहे. वादी यांचा दावा मिळकती बरोबर कोणताही हक्क, हितसंबंध नसल्याने वादी यांना हिस्सा देण्याचा प्रश्नच येत नाही. त्याबाबतचे वादीचे दाव्यातील संपुर्ण कथन हे खोटे व काल्पनीक असे आहे असे कथन केले आहे.

(१२) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे संपुर्ण दावा मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत. वादी यांचा दावा मिळकती बरोबर कोणताही संबंध नसल्यामुळे वादी यांना हिस्सा अलग व तुटक करून मागणेचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही. वादी यांना प्रतिवादी यांचे विरूध्द निरंतरची ताकीद मागणेचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. वादी यांना सकृत दर्शनी चांगली केस असून न्यायाचे समतोलत्व वादी यांचे लाभात असल्याबाबतचे वादी यांचे कथन साफ खोटे आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीचे कायदेशीर मालक असल्यामुळे प्रतिवादी यांना त्यांचे मर्जीप्रमाणे मिळकतीचा उपभोग घेण्याचा व विल्हेवाट लावणेचा कायदेशीर अधिकार आहे त्यास वादींना कोणतेही बंधन करणेचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही असे कथन केले आहे.

(१३) प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, हिस्सा मागणेसाठी वादी हे कधीही प्रतिवादी यांचे कडे आलेले नव्हते व नाही. त्यामुळे नकार देण्याचा प्रसंग घडलेला नाही. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, मयत हनुमंत सखाराम नवले यांचा कायदेशीर विवाह कल्याबाई हनुमंत नवले यांचे बरोबर झालेला होता. वादी यांचा दावा मिळकतीबरोबर व प्रतिवादी यांचे कुटूंबाबरोबर कोणताही हक्क व हितसंबंध नसल्यामुळे वादी यांनी दाव्यात चुकीची विधाने नमूद केलेली आहे. दाव्यातील शेतजमिनीचे मालक सखाराम केदु नवले हे

ता.१८/२/१९६७ रोजी मयत झाल्यानंतर फेरफार नोंद क्र. १४०५ प्रमाणे कायदेशीर वारसाची नावे दाखल झाली व ती नोंद ता. २२/१२/१९६७ रोजी मंजुर करण्यात आलेली आहे. त्यानंतर सखाराम केदु यांची पत्नी सोन्याबाई सखाराम नवले ही ता. २४/१०/१९७९ रोजी मयत झाल्यानंतर फेरफार नोंद क्र. १३३ अन्वये वारसाची नावे दावा मिळकतीस दाखल करण्यात आली ती नोंद ता. १७/४/१९८० रोजी मंजुर झली. परंतु दाव्यातील शेतजमिनी ह्या मयत हनुमंता सखाराम नवले यांच्या वडीलोपार्जीत मालकीच्या व प्रत्यक्ष कब्जावहीवाटीतील अशा असल्याने दावा मिळकतींना पुर्वीचे सर्व्हे नंबर नमूद असतानाच ता. २०/१/१९७१ रोजी दावा मिळकती ह्या प्रतिवादी क्र.१ राजेंद्रकुमार हनुमंता नवले व अज्ञान पालन करणार आई कलावतीबाई उर्फ कल्याबाई हनुमंत नवले यांच्या नावाने फेरफार नोंद क्र. १४९४ प्रमाणे करून दिलेल्या होत्या व आहे. सखाराम केदु नवले हे मयत झाल्यानंतर दावा मिळकतींना पत्नी सोन्याबाई सखाराम नवले व हनुमंत सखाराम नवले व मुली लक्ष्मीबाई विठ्ठल ठाकरे, गिताबाई दगु शिंदे, शांताबाई चिमा मापारी, कल्याबाई बाजीराव ठाकरे यांची नावे फेरफार नोंद क्र. १४०५ अन्वये दाखल झालेली होती. प्रतिवादी क्र. १ हे आजोबा श्री. गणपत भावराव मगर यांचेकडे मौजे खंडाळा, ता. वैजापुर, जि. संभाजीनगर येथे शिक्षणासाठी राहत होते व त्यानंतर पुढील शिक्षणासाठी संभाजीनगर (औरंगाबाद) येथे राहत होते. त्यावेळी प्रतिवादी क्र. १ हे आईवडील मयत हनुमत सखाराम नवले व मयत कल्याबाई हनुमंत नवले यांचेकडे येऊन राहत असत. मयत हनुमंत सखाराम नवले यांचेपासून कल्याबाई उर्फ इंदुबाई यांना प्रतिवादी क्र. १ यांचे जन्मानंतर अपत्ये झाले नाही म्हणून मयत हनुमंत सखाराम नवले यांनी गंगाधर सखाराम चौधरी यांची मुलगी रंजना हीचे बरोबर विवाह केला त्यानंतर दाव्यातील शेतजमिनी ह्या मयत हनुमंता सखाराम नवले व कल्याबाई उर्फ इंदुबाई व प्रतिवादी क्र.६ हे वहीती करून उत्पन्न घेत होते. त्यानंतर हनुमंत सखाराम नवले यांचे माहे फेब्रुवारी १९९९ मध्ये मोटारसायकलचे अपघातात दुर्देवी निधन झाले. त्यानंतर दाव्यातील शेतजमिनी

ह्या कल्याबाई उर्फ इंदुबाई व प्रतिवादी क्र.१ व ६ हे वहीती करून उत्पन्न घेत होते. दाव्यातील शेतजमिनी ह्या कल्याबाई हनुमंता नवले, प्रतिवादी क्र. १ व ६ हे वहीती करीत असताना माहे ऑगस्ट २०२१ मध्ये कल्याबाई उर्फ इंदुबाई हनुमंत नवले यांचे निधन झाले त्यानंतर दावा मिळकती ह्या प्रतिवादी क्र.१ व ६ हे मालकी हक्काने वहीती करून उत्पन्न घेत होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांचे नोकरी मुळे व प्रतिवादी क्र.६ यांचे उतारवयामुळे प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी त्यांच्या मालकीच्या शेतजमिनी ह्या बटाईने दिलेल्या आहेत असे कथन केले आहे.

**(१४)** प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी क्र. २ यांच्या देखील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दिघवद ता. चांदवड चा शाळा सोडल्याचा दाखला दाव्यासोबत दाखल केलेला आहे. परंतु शाळेत विद्यार्थी प्रवेश निर्गम प्रमाणे नोंदणी रजिष्टर मध्ये नोंद होणेसाठी पालकाचे सहीचा प्रवेश अर्ज व पालकाच्या सहीचा प्रवेश अर्ज हे आवश्यक असतात असे कोणतेही अर्ज संबंधीत शाळेकडे नाही. विद्यार्थ्यांचा शाळेत प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचे पालकाचा प्रवेश अर्ज पालकाचे सहीसह आवश्यक असतो असा कोणताही खात्रीशीर दस्त नसतानाही वादी क्र. २ यांनी त्यांच्या शाळेचा दाखला मे. कोर्टात दाखल केलेला आहे. वादी क्र. २ यांनी संगनमताने खोटा व बेकायदेशीर शाळा सोडल्याचा दाखला मे. कोर्टात दाखल केला आहे तो खरा नाही असे कथन केले आहे.

**(१५)** प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी दावा दाखल करताना फक्त मयत हनुमंत सखाराम नवले यांचे नाव लावुन घेतले आहे. प्रतिवादी क्र. १ चे वडील व प्रतिवादी क्र.६ चे पती श्री. हनुमंत सखाराम नवले यांचे ता. १९/२/२०११ रोजी मोटारसायकल अपघातात दुदैवी निधन झाले अपघातानंतर मयत हनुमंत सखाराम नवले यांना नाशिक आडगाव नाका साईसेवा दवाखान्यात दाखल करून उपचार देखील करण्यात आले होते परंतु दुदैवाने त्यांचे निधन झाले. मयत हनुमंत सखाराम नवले यांचे जिल्हा रूग्णालयत येथे

शवविच्छेदन करण्यात आले होते व त्यांचा अंत्यविधी व उत्तरकार्य मौजे हिवरखेडे ता. चांदवड येथे करण्यात आले होते. या सर्व बाबीची वादी यांचा मयत हनुमंत सखाराम नवले यांचे बरोबर कोणताही संबंध नसल्यामुळे माहीती नाही तसेच मयत हनुमंत सखाराम नवले यांचा अपघात झाल्यानंतर व अंत्यविधीसाठी किंवा उत्तर कार्यासाठी देखील वादी कधीही आढलेले नाही. वादी यांनी काल्पनीक रचना करून प्रस्तुतचा खोटा दावा मे. कोर्टात दाखल केलेला आहे म्हणून वादी यांना वस्तुस्थितीबाबत व वास्तवाबाबत कोणतीही माहीती नाही. केवळ चुकीचे, खोटे शाळेचे दाखले तयार करून घेऊन वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला दिसतो म्हणून तो खरा नाही. वादी यांनी त्यांचे जन्माचे दाखले मात्र मे. कोर्टात दाखल केलेले दिसत नाही म्हणून वादी यांचा दावा खोटा असल्याने रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे. वादी यांनी दाखल केलेला दावा हा संपुर्ण काल्पनीक खोटा आहे. कारण वादी यांनी दाव्याकामी दाखल केलेले दाखले हे खोटे आहेत म्हणून दावा खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे असे कथन केले आहे.

(१६) वादी व प्रतिवादींच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद ऐकला. दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिली. वरील परिस्थितीत माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांचा कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्रं.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादींनी आपले म्हणणे सकृतदर्शनी (Prima–facie case ) सिध्द केले आहे काय ? | **...होकारार्थी.** |
| २ | न्यायाचे समतोलत्व (Balance of convenience) वादींचे बाजुने आहे काय ? | **...होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान (irreparable loss) होणार आहे हे वादींनी सिध्द केले आहे काय ? | **...होकारार्थी.** |
| ४ | कोणता आदेश ? | **अंतिम ओदशानुसार.** |

**कारणमिमांसा**

**विचाराधीन प्रश्न क्रं. १ ते ३ करीताः–**

(१७) उभयपक्षकारांच्या तज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दस्तऐवजांचे अवलोकन केले.

(१८) वादींचे त्यांच्या अर्जात असे कथन आहे की, मिळकत गट क्र. १६ व २०२ या ह्या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जीत मिळकती असुन वादीचे मुळ पुरुष हनुमंत नवले हे होते हनुमंत नवले यांना इंदुबाई वत्सलाबाई, शामाबाई, व रंजनाबाई अशा चार पत्नी होत्या व त्यापैकी इंदुबाई वस्तलाबाई व शामाबाई या मयत आहे, त्यापैकी इंदुबाई यांना वारस मुलगा नामे राजेंद्र हा आहे, तसेच वत्सलाबाई हिस वारस एक मुलगी नामे अलका ही असुन मयत शामाबाई हिस एक मुलगा नामे चंद्रशेखर हा आहे व चौथी पत्नी नामे रंजनाबाई ही हयात आहे. तसेच लक्ष्मीबाई विठ्ठल ठाकरे ही वादी व प्रतिवादी क्र.१ चे वडीलांची बहिण होती व लक्ष्मीबाई विठ्ठल ठाकरे ही मयत असुन तिस प्रतिवादी क्र.२ हा एकमेव वारस आहे व तसेच शांताबाई चिमा मापारी ही देखील मयत हनुमंत नवले म्हणजे वादी व प्रतिवादी क्र.१ चे वडील यांची बहिण होती व तिस प्रतिवादी क्र.३ ते ५ हे वारस आहेत असे कथन केले आहे.

(१९) वादींचे त्यांच्या अर्जात असे कथन आहे की, हनुमंत सखाराम नवले हे ता.१९/०२/२०११ रोजी मयत झाले असुन त्यांचे मृत्युनंतर उपरोक्त मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ़ राईट्सला फेरफार नोंद क्र.१३५१ नेवारसांची नावे दाखल झाली त्यावेळी प्रतिवादी यांनी वादी क्र. १ यास काहीएक कल्पना न देता त्यांचे पश्चात वारस नोंद करुन घेतली. वादी क्र.१ ची आई शामाबाई हिचा मयत

हनुमंत नवले यांनी त्याग केल्यामुळे वादी क्र.१ हा लहानपनासुनच तारुखेडले, ता. निफाड, जि.नाशिक मामाचे गावी आस्त्रयास राहत होता. वादी क्र.१ चे आईने गंधर्व विवाह केला त्यामुळे वादी क्र.१ चे पालण, पोषण व सांभाळ हा त्यांचे मामा यांनीच केला. त्यानंतर वादी क्र.१ हे कामधंद्या निमित्ताने मुंबई येथे राहु लागले व त्यांचे गावी हिवरखेडे येथे येणे जाणे नसल्याने प्रतिवादी यांनी वडील मयत झाले बाबत देखील वादी क्र.१ यास कळविले नाही व परस्पर लबाडीने वादी क्र. १ चे संमती विना फेरफार नोंद क्र.१३५१ मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ़ राईट्सला वारसाने करुन घेतली व तसेच वादी क्र.२ हिस देखील या बाबत कल्पना दिली नाही. अलिकडे वादी क्र.१ हा गावी आला असता त्याने मिळकतीचे ७/१२ उतारे व फेरफार नोंदी काढल्या असता प्रतिवादी यांनी मिळकतीचे ७/१२ उता–यावर रेकॉर्ड ऑफ़ राईट्स सदरी फेरफार नोंद क्र. १३५१ ही बेकायदेशिर केल्याचे निदर्शनास आले. वादी हे मयत हनुमंत नवले यांचे कायदेशिर वारसदार असुन वादी यांचा दावा मिळकतीमध्ये कायदेशिर अविभक्त असा हिस्सा आहे. प्रतिवादी यांनी हेतुपुरस्करपणे वादी यांना दावा मिळकतीमध्ये असलेला त्यांचा कायदेशिर हिस्सा द्यावा लागु नये म्हणून उपरोक्त कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर बेकायदेशिरपणे वारसा हक्काने स्वतःची नावे लावुन घेतलेली आहे व प्रतिवादी क्र.१ ने उडवा उडवीची उत्तरे देवुन वादींचा असलेला कायदेशीर अविभक्त हिस्सा देण्यास टाळाटाळ केली. वादी यांचा दावा मिळकतीमधील असलेला अविभक्त हिस्सा वादी यांना द्यावा लागु नये म्हणुन प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी आपआपसात संगनमत करुन वादी यांचा दावा मिळकती मधील असलेला अविभक्त हिश्यास बाधा आणन्याचे उद्देशाने दावा मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ़ राईट्स बेकायदेशिर अशी फेरफार नोंद क्र. १३५१ ही केलेली असुन सदरचे नोंदीने प्रतिवादी क्र.१ व ६ यांना पुर्णपणे हक्क मिळत नाही, सदरची नोंद ही वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचेवर बंधनकारक नाही व तसेच वादी यांचा दावा मिळकती मध्ये सामाईक अविभक्त हिस्सा आहे त्यामुळे वादी यांनी त्यांचा असलेला अविभक्त हिस्सा अलग व तुटक करुन मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे व मिळकती सदरी

प्रतिवादी क्र. १ व ६ यांचे नावावर आहे याचा गैरफ़ायदा घेवुन प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी दावा मिळकती कुणासही खरेदी, विक्री, गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र वगैरे तबदीलीच्या लेखाने तबदीली करु नये व मिळकतीवर कर्जाचे बोजे निर्माण करु नये अशी निरंतरची ताकीद देवविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

(२०) प्रतिवादींचे त्यांच्या लेखी उत्तरात असे कथन आहे की, वादी यांचा मयत हनुमंत सखाराम नवले यांचे कुटूंबाबरोबर कोणताही संबंध नव्हता व नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दाव्यातील मिळकत गट क्र. १६ व २०२ या मिळकती बरोबर वादी यांचा कोणताही हक्क व हितसंबंध नाही व मिळकती वडीलार्जीत असल्याबाबतचे वादीने चुकीचे कथन केलेले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत हनुमंत सखाराम नवले यांना इंदुबाई हनुमंत नवले ह्या प्रथम पत्नी होत्या. त्यानंतर मयत हनुमंत सखाराम नवले यांनी प्रतिवादी क्र. ६ रंजनाबाई हनुमंत नवले यांचे बरोबर दुसरा विवाह केला होता परंतु वादी यांनी कथन केलेल्या दाव्यातील वत्सलाबाई व शामाबाई यांचे बरोबर मयत हनुमंत सखाराम नवले यांचा कोणताही संबंध नव्हता व नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत हनुमंत सखाराम नवले यांचेपासून शामाबाई नावाच्या महिलेस वादी क्र.१ चंद्रशेखर हा मुलगा झालेला नव्हता. तसेच मयत हनुमंत सखाराम नवले यांचेपासून वत्सलाबाई नावाचे महिलेस वादी क्र.२ अलका ही मुलगी झालेली नव्हती. त्याबाबतचे वादीचे दाव्यातील कथन हे साफ खोटे आहे. मयत हनुमंत सखाराम नवले यांना पत्नी इंदुबाई उर्फ कल्याबाई हनुमंत नवले यांचेपासून प्रतिवादी क्र.१ राजेंद्रकुमार हनुमंत नवले हा एकमेव मुलगा असून प्रतिवादी क्र. १ हेच दावा मिळकतीचे मयत हनुमंत सखाराम नवले यांचे कायदेशीर वारस आहेत इतर कुणीही वारस नसल्याचे कथन केले आहे.

(२१) प्रतिवादींचे त्यांच्या लेखी उत्तरात असे कथन आहे की, दाव्यातील मिळकतींना प्रतिवादी क्र. १ यांचे नाव ता. २०/१/१९७१ रोजी झालेले फेरफार नोंद क्र. १४९४ नुसार दाखल झालेले होते व ती नोंद मे. मंडल

अधिकारी यांनी ता.९/३/१९७१ रोजी मंजुर केलेली आहे. वादी यांना दावा मिळकतीची व दाव्याचा रेकॉर्डची कोणतीही माहीती नसल्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांची नावे फेरफार नोंद क्र.१३५१ प्रमाणे दाखल करण्यात आली असे खोटे व चुकीचे कथन केलेले आहे. मयत हनुमंत सखाराम नवले यांचे बरोबर वादी क्र. १ व २ यांचा कोणताही संबंध नसल्यामुळे मयत हनुमंत सखाराम नवले यांचे मृत्युबाबत कळविण्याचा कोणताही संबंध नव्हता व नाही. तसेच वादी क्र. १ यांचे संमतीविना फेरफार नोंद क्र. १३५१ ही रेकॉर्ड ऑफ राईटला वारसाने करून घेतली तिचे बाबत वादी क्र. २ हीस देखील कळविले नाही कारण वादी यांचा दावा मिळकती बरोबर व प्रतिवादी क्र. १ व ६ चे कुटूंबाबरोबर कोणताही संबंध नसल्यामुळे वादींना मयत हनुमंता सखाराम नवले यांचे मृत्यु बाबत कळविण्याचे कोणतेही कारण नव्हते व नाही. रेकॉर्ड ऑफ राईटला झालेली फेरफार नोंद क्र. १३५१ ही पुर्णतः कायदेशीर अशी आहे. वादी हे मयत हनुमंता सखाराम नवले यांचे कायदेशीर किंवा कोणत्याही अर्थाने वारस नव्हते व नाही. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कायदेशीर अविभक्त हिस्सा असल्याचा प्रश्नच उद्भवत नाही. वादी यांचा दावा मिळकती बरोबर कोणताही हक्क व हितसंबंध नसल्याने वादी यांना हिस्सा देण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. रेकॉर्ड ऑफ राईटला ता. २०/१/१९७१ रोजी वारस नोंद क्र. १४९४ ही झालेली असून त्यानंतर ता. २४/६/२०११ रोजी फेरफार नोंद क्र. १३५१ प्रमाणे पुन्हा वारस नोंद झालेली आहे. या उपरोक्त नोंदी बाबत वादी यांनी सुमारे ५२ वर्षामध्ये कधीही कोणतीही तक्रार केलेली नव्हती व नाही. म्हणून वादीचा दावा साफ खोटा असा आहे असे कथन केले आहे. प्रतिवादी हे संपुर्ण दावा मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत. वादी यांचा दावा मिळकती बरोबर कोणताही संबंध नसल्यामुळे वादी यांना हिस्सा अलग व तुटक करून मागणेचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही. वादी यांना प्रतिवादी यांचे विरूध्द निरंतरची ताकीद मागणेचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. वादी यांना सकृत दर्शनी चांगली केस असून न्यायाचे समतोलत्व वादी यांचे लाभात असल्याबाबतचे वादी यांचे कथन साफ

खोटे आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीचे कायदेशीर मालक असल्यामुळे प्रतिवादी यांना त्यांचे मर्जीप्रमाणे मिळकतीचा उपभोग घेण्याचा व विल्हेवाट लावणेचा कायदेशीर अधिकार आहे त्यास वादींना कोणतेही बंधन करणेचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. केवळ चुकीचे, खोटे शाळेचे दाखले तयार करून घेऊन वादी यांनी प्रस्तुतचा दाखल केलेला दावा खोटा असल्याने मनाई हुकुमाचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

(२२) उभयपक्षकारांच्या तज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादीने सदर दावा वाटपाकरीता व कब्ज्या करीता दाखल केला आहे. वाद मिळकती यापूर्वी हनुमंत नवले यांच्या मालकीच्या होत्या. प्रतिवादी क्र. १ व ६ यांनी सदर मिळकती महसूल अभिलेखावर त्यांच्या नावाने हस्तांतरीत केलेल्या आहे. वाद मिळकती या आजरोजी प्रतिवादी क्र. १ व ६ यांच्या नावाने महसूल अभिलेखात नोंद असल्याने दाव्याचा निकाल लागेपर्यंत त्यांनी वाद मिळकतीत तृतीय पक्षाचा हक्क अधिकारी निर्माण करु नये या करीता वादीने तात्पूरता मनाई हुकूमा करीता अर्ज केला आहे. प्रतिवादींनी वादी हे मयत हनुमंत नवले यांचे वारस नसल्याचे व त्यांचा वाद मिळकतीशी काहीही संबंध नसल्याने व त्यांचा वाद मिळकतीत कोणताही हिस्सा नसल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. वादी मयत हनुमंत नवले यांचे वारस आहेत किंवा कसे ही बाब उभय पक्षांनी त्यांचा पुरावा दिल्यानंतर सिद्ध होणार आहे. यावेळी वाद मिळकत ही प्रतिवादी क्र. १ व ६ यांच्या नावाने महसूल अभिलेखात दर्ज असल्याने त्यांनी वाद मिळकतीवर तृतीय पक्षाचा हक्क व अधिकार निर्माण केल्यास दाव्यात गुंतागुंत होण्याची शक्यता असल्याने व यावेळी प्रतिवादींना वाद मिळकतीत तृतीय पक्षाचा वाद हक्क निर्माण करण्यापासून थांबविल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वरील विवेचनाप्रमाणे वादींनी प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने सिध्द केली आहे, न्यायाचा तराजू व प्रकरणातील समतोलत्व वादीच्या बाजूने आहे. तसेच, जर तुर्तातुर्त मनाई हूकूमाचा आदेश पारीत केला

नाही तर वादीचे कशानेही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. म्हणुन वरील सर्व बाबींचा विचार करता मी प्रश्न क्रं. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून विचाराधीन प्रश्न क्रं. ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज नि.क्रं. ०५ मंजुर करण्यात येतो. |
| २. | या दाव्याचे अंतिम निकालापर्यन्त प्रतिवादी क्र. १ व ६ यांनी दावा मिळकती कुणासही खरेदी, विक्री, गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र वगैरे तबदीलीच्या लेखाने तबदीली करु नये व मिळकतीवर कर्जाचे बोजे, तृतीय पक्षाचा हक्क व अधिकार निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त–तात्पुरता मनाई हुकुमाने ताकिद देण्यात येते. |
| ३. | खर्चाबाबत दाव्याचे अंतिम निकालाचे वेळी विचार करण्यात यावा. |

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.05.02 13:57:26 +0530

ठिकाण : चांदवड. **(एस. एस. छल्लाणी)**

दिनांक : **०२/०५/२०२६**. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, चांदवड.

## <u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्रं.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | ०२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ०२/०५/२०२६ |